महाराष्ट्र विधानपरिषद

दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - २०

परभणी जिल्ह्यात विविध घरकुल योजनेतील काम प्रलंबित असल्याबाबत

(१) ३५९१ (२८-०५-२०२०) श्री.विप्लव बाजोरिया : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात विविध घरकुल योजनेतील ११ हजार ९१५ घरकुलांचे काम पूर्ण झाले असून २० टक्के काम अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शबरी आवास योजनेत परभणी, सेलू व पाथरी तालुक्यात ज्या गतीने काम केले त्याप्रमाणे इतर योजनांची कामे का करण्यात आली नाहीत,

(३) असल्यास, पावसाळा जवळ आला असताना घरकुलाचे काम अपूर्ण असल्याने गरिबांना उघड्यावर किंवा भाड्याच्या घरात राहावे लागेल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर घरकुल योजनेतील प्रलंबित कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ (१४-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) परभणी जिल्ह्यातील ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

PHASE I

अ.क्र.	योजना	वर्ष	उद्दिष्ट	भौतिक साध्य	टक्केवारी
१.	प्रधानमंत्री आवास योजना-ग्रा	सन २०१६-१७ ते २०१८-१९	३९४१	३५९६	९१.२५%
२.	रमाई आवास योजना	सन २०१६-१७ ते २०१८-१९	१०८४१	९५१८	८७.७९%
३.	शबरी आवास योजना	सन २०१६-१७ ते २०१८-१९	१२३	११४	९२.६८%
४.	पारधी आवास योजना	सन २०१६-१७ ते २०१८-१९	५६	५१	९१.०७%

PHASE -II

अ.क्र.	योजना	वर्ष	उद्दिष्ट	भौतिक साध्य	टक्केवारी
१.	प्रधानमंत्री आवास योजना-ग्रा	सन २०१९-२० PHASE -II	३१५४	१६२९	५१.६५%
२.	रमाई आवास योजना	सन २०१९-२० PHASE -II	३०००	२०००	६६.६६%
३.	शबरी आवास योजना	सन २०१९-२० PHASE -II	५२३	२०३	३८.८१%

केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजनेंतर्गत अपूर्ण घरकुले पूर्ण न होण्यामागील कारणे पुढीलप्रमाणे आहेत :-

१. प्रथम हप्ता घेऊन लाभार्थी स्थलांतरीत होणे.

२. रेतीचा पुरवठा वेळेवर न होणे.

३. मयत लाभार्थी वारस निश्चितीची प्रक्रिया पूर्ण करणे.

४. ऊसतोड कामगारांचे स्थलांतर.

५. सन २०१९-२० वर्षापासून कोविड-१९ संसर्गजन्य आजारामुळे लॉकडाऊन कालावधीमध्ये बहुतांश घरकुले विविध कारणाने पूर्ण होऊ शकलेली नाहीत.

(३) हे खरे नाही.

(४) अपूर्ण घरकुले पूर्ण करण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात येत आहे. सर्व प्रगतीपथावरील घरकुले मार्च, २०२२ अखेर पूर्ण करण्याचे सुक्ष्म नियोजन करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहर व जिल्हयातील प्लॉटधारकांची फसवणूक करण्यात आल्याबाबत

(२) ५९४७ (२७-११-२०२०) श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहर व जिल्हयात भू-माफियाचे जाळे पसरले असून भू-माफियांनी प्लॉटधारकांना रजिस्ट्रीनंतरही प्लॉटचा ताबा दिला नसून काही ले-आऊट धारकांनी एकच प्लॉट अनेकांना विकल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनाबंधू भूमि विकास संस्था रजि.नं. २६१/८९ या संस्थेने रजिस्ट्रीनंतरही प्लॉटधारकांना प्लॉटचा ताबा दिला नसल्यामुळे दिनाबंधू भूमि विकास संस्थेच्या प्लॉटधारकांनी दिनांक १९ ऑक्टोंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.पालकमंत्री, नागपूर जिल्हा यांचेकडे तक्रार केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित ले आऊटधारक व त्यांना संरक्षण देणाऱ्या राजकीय, महानगरपालिकेचे तसेच नागपूर सुधार प्रन्यासचे अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिलीप वळसे-पाटील (२०-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

दिनांक २७/०१/२०१२ मौजा नारी खसरा नं.१४१/१ सीटी सर्वे नं.३२३ शिट नं.३४१/९३, नारी रोड बँक कॉलनी प्लॉट नं.०४ हा ३२०० चौरस फुटाचा प्लॉट सह दुय्यम निबंधक वर्ग-०२ नागपूर शहर येथे विक्रीपत्र नगन १-००७४४-२०१२ अन्वये रजिस्ट्री करुन सुनिल काशिनाथ मेश्राम, नागपूर याने रुपये १७ लाख रुपयास श्री.इंदरप्रितसिंग दलजितसिंग तुली यांना विकला होता.तोच प्लॉट मेश्राम याने दिनांक २५/०५/२०१२ रोजी मनोज दशरथ सांगोळे यास विकल्याचे निदर्शनास आले. मेश्राम याने एकच प्लॉट दोन लोकांना विकलेला असून त्याने फसवणूक केली म्हणून ऑक्टोबर, २०२० मध्ये श्री.इंदरप्रितसिंग दलजितसिंग तुली यांनी फिर्याद दिल्यानुसार सुनिल काशिनाथ मेश्राम याच्या विरुध्द भादंवि कलम ४२० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) अशा प्रकारचा अर्ज मा.पालकमंत्री, नागपूर यांचेकडे प्राप्त झालेला नाही.

(३) सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्यांबाबत

(३) ८७५१ (१०-०६-२०२१) श्री.कपिल पाटील : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्या १०० टक्के करण्यात याव्यात तसेच, कोकण विभागातील सिंधुदुर्गसह इतर जिल्हयांचा समावेश करण्यात यावा अशी मागणी प्राथमिक शिक्षक संघटनांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जिल्हा परिषद शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ (०८-०६-२०२२) : (१) प्राथमिक शिक्षक संघटनेकडून मागणी प्राप्त झाली आहे, हे खरे आहे.
(२) जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्यांकरीता दिनांक ०७/०४/२०२१ च्या शासन निर्णयातील अटींची पुर्तता करणाऱ्या प्राथमिक शिक्षकांना ऑनलाईन प्रणालीमध्ये सहभाग घेता येतो. समानीकरणाच्या तत्वानुसार १०% पेक्षा अधिक पदे रिक्त राहणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. कोकण विभागातील सर्वच जिल्हयामध्ये रिक्त पदांची टक्केवारी १०% पेक्षा अधिक असल्यामुळे संबंधित जिल्हयातील शिक्षकांना कार्यमुक्त करण्यात येत नाही.

काही जिल्हा परिषदांमधील रिक्त पदांची टक्केवारी १०% पेक्षा जास्त असल्यास त्या जिल्हयामध्ये शिक्षकांची नियुक्ती झाल्यानंतर तेथील बदली झालेल्या शिक्षकांना अन्य जिल्हा परिषदेमध्ये आंतरजिल्हा बदलीने कार्यमुक्त करणे शक्य होईल. त्यामुळे जिल्हा परिषदांमध्ये रिक्त पदांची टक्केवारी १०% पेक्षा जास्त असली तरी, जिल्हा परिषद शिक्षकांच्या सन २०२२ मध्ये होणाऱ्या ऑनलाईन बदली प्रक्रियेमध्ये सर्व जिल्हा परिषदांना सहभागी करुन घेणे आवश्यक असल्याबाबत मे.विन्सीस सॉफ्टवेअर कंपनी यांना दिनांक ०१/०६/२०२२ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले असून त्यानुसार संगणक प्रणालीमध्ये सुधारणा करण्याबाबतही त्यांना सूचना दिलेल्या आहेत. तसेच दिनांक ०१/०६/२०२२ चे पत्र सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनादेखील कार्यवाहीकरीता चिन्हांकित केलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन कपात न करता त्यांना विशेष स्वतंत्र भत्ता देण्याबाबत

(४) ९१६९ (१५-०७-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना महामारीला सामोरे जाण्यासाठी सहाय्य म्हणून राज्यातील सर्व भा.प्र.से., भा.पो.से., म.पो.से. व सर्व शासकीय निमशासकीय राजपत्रित अधिकारी व कर्मचारी यांचे माहे मे, २०२१ च्या वेतनातील १ किंवा २ दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये देण्याचे परिपत्रक शासनाने माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान काढले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास कोरोनासाठी फ्रंटलाईन करीअर म्हणून अतिरिक्त काम करणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतनातूनही १ किंवा २ दिवसांचे वेतन कपात केले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या या निर्णयाला राज्यातील पोलिसांनी विरोध दर्शवला असून सोशल मिडियाच्या माध्यमातून आपली नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने फ्रंटलाईनमध्ये काम करणाऱ्या पोलिसांना विशेष भत्ता देण्याची घोषणा करुनही त्याची अंमलबजावणी केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कोरोना काळात दिवस रात्र काम करणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन कपात न करता त्यांना विशेष स्वतंत्र भत्ता देवून प्रोत्साहित करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिलीप वळसे-पाटील (२०-०६-२०२२) : (१), (२) व (३) होय.

सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दिनांक ०७/०५/२०२१ अन्वये राज्यातील कोरोना आपत्ती निवारणाच्या उपाययोजनांकरीता राज्यातील सर्व भा.प्र.से,भा.पो.से, भा.व.से व महाराष्ट्र राज्य शासकीय/निमशासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या माहे मे,२०२१ च्या वेतनातील एक/दोन दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये देणगी म्हणून देण्याचे आवाहन करण्यात आले होते. सदर बाब अधिकारी/कर्मचारी यांच्याकरीता ऐच्छीक स्वरुपाची असून वेतन कपातीबाबत हरकत असल्यास संबंधित कार्यालय प्रमुखास कळविण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

(४), (५) व (६) मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी एक/दोन दिवसांचे वेतन देणे ऐच्छिक स्वरुपाचे होते. कोविड काळात फ्रंटलाईन मध्ये काम करणाऱ्या पोलीस अधिकारी /कर्मचा-यंना विशेष भत्ता मंजूरीबाबत कोणतेही आदेश पारित झालेले नाहीत.

नाशिक जिल्हापरिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अटक केल्याबाबत

(५) १०४०९ (०६-०१-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाचखोरीच्या प्रकरणात फरार झालेल्या नाशिक जिल्हापरिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी, डॉ.वैशाली झनकर-वीर यांना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान गंगापूर रोड भागातून अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळून आलेल्या माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-०६-२०२२) : (१) शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे थकीत वेतन काढून व पुढे नियमित वेतन सुरु करण्याकरिता आवश्यक कार्यादेश काढुन देण्याकरीता तत्कालीन प्राथमिक शिक्षक, जि.प. शाळा, राजेवाडी, नाशिक यांनी तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. नाशिक यांच्याकरीता रुपये ९ लक्ष रुपये लाचेची मागणी केली. तसेच तडजोडीअंती रुपये ८ लक्ष लाचेची रक्कम दिनांक १०/०८/२०२१ रोजी तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. नाशिक यांच्या सांगण्यावरुन, त्यांच्या शासकीय वाहनावरील वाहनचालक, शिक्षणाधिकारी कार्यालय, जि.प. नाशिक यांनी स्विकारली म्हणुन त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांना दिनांक १३/०८/२०२१ रोजी अटक करण्यात आली आहे.

(२) तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. नाशिक यांना दिनांक १३/०८/२०२१ रोजी निलंबित करण्यात आले आहे. तसेच इतर दोन लोकसेवक यांना निलंबित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना कंत्राटी पध्दतीने शासन सेवेत नियुक्ती देण्याबाबत

(६) १०५९६ (०५-०१-२०२२) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विलास पोतनीस : दिनांक ६ जुलै, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ६३६४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्‌योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासन सेवेत समावेश करण्यासंदर्भात शासनाने दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेतला. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या कार्यालयीन अस्थापनेच्या रिक्त जागेवर कंत्राटी तत्वावर नियुक्त्या देण्यासाठी कौशल्य विकास व उद्‌योजकता विभागाने दिनांक २ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यपध्दती निश्चित केली असून वित्त विभागनेही दिनांक ३० सप्टेंबर, २०२० रोजीच्या परिपत्रकानुसार राज्यातील शासकीय कार्यालयांना सुचित केले आहे. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या परिपत्रकानुसार पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना कंत्राटी पध्दतीने नियुक्त्या देण्याबाबतची अंमलबजावणी अद्‌याप कोणत्याच शासकीय कार्यालयाने केली नसल्याने अंशकालीन कर्मचाऱ्यामध्ये असंतोष निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पदवीधर अंशकालीन उमेवारांना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध होण्यासाठी त्यांना वयाच्या बाबतीत सवलत देवून प्राधान्याने कंत्राटी पध्दतीने शासन सेवेत नेमणुका देण्याबाबत शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (२०-०६-२०२२) : (१) नाही.
(२) हे खरे आहे.
मंत्रीमंडळाच्या दिनांक ११/१२/२०१८च्या निर्णयानुसार उक्त निर्देश दिले आहेत.
(३) हे खरे नाही.

अ.क्र.	विभाग	साप्रवि शा.नि. दिनांक २७/१०/२००९ नुसार नियुक्त उमेदवारांची संख्या	कंत्राटी तत्वावर नियुक्त उमेदवारांची संख्या
१.	मुंबई	१४१	४
२.	पुणे	५६६	१२०
३.	नाशिक	१२४	२
४.	औरंगाबाद	३४७	१५
५.	अमरावती	२६९	१७७
६.	नागपूर	३६९	२५
	एकूण	**१८११**	**३४३**

(४) शासन परिपत्रक दिनांक ०२ मार्च, २०१९ व दिनांक ३० सप्टेंबर, २०२० निर्गमित केल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.
(५)प्रश्न उद्‌भवत नाही.

___

चंद्रपूर जिल्हयातील आरोग्य विभागांतर्गत ग्रामीण रूग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रात नविन आकृतीबंधानुसार कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(७) १०८५७ (०६-०१-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील ग्रामीण रुग्णालयामधील गट "क" व गट "ड" संवर्गातील १७७ रिक्त पदे भरण्यास मा.मंत्रिमंडळाची मान्यता मिळूनही पदभरती करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्हयातील आरोग्य विभागांतर्गत ग्रामीण रूग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रात नविन आकृती बंधानुसार ४०० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रूग्णालयाचा वाढता विस्तार व वाढती लोकसंख्या व सुविधेनुसार नविन आकृतीबंधानुसार रिक्त जागा भरणे आवश्यक असताना जुन्या आकृती बंधानुसार रिक्त पदे भरली जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आरोग्य केंद्रातील रिक्त पदे नविन आकृतीबंधानुसार भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (२६-०५-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

गट क व ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने माहे ऑगस्ट २०२१ मध्ये जाहिरात देण्यात आली होती. सदर भरती परिक्षेच्या पेपर फुटीच्या तक्रारीच्या अनुषंगाने सायबर पोलीस स्टेशन शिवाजीनगर, पुणे येथे गुन्हा नोंदवला असून सदर प्रकरणी पोलीसांकडून तपास सुरू आहे. पोलीसांचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(२) हे अंशत: खरे आहे.

नवीन आकृतीबंधानुसार गट क व ड या संवर्गातील सार्वजनिक आरोग्य विभागातील ३४५ पदे व ग्रामविकास विभागाकडील ४०६ पदे रिक्त आहेत.
(३) व (४) प्राप्त अहवालानुसार नियमित गट क व ड पदांच्या पदनिर्मितीच्या संदर्भात वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णयान्वये नियमित पदांची बिंदूनामावलीमध्ये समावेश करण्यात येऊन त्यानुसार रिक्त पदे भरणेची कार्यवाही सुरू आहे. सार्वजनिक आरोग्य विभागातील आरोग्य संस्थांचा नवीन आकृतिबंध अद्याप प्रस्तावित झालेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात मराठी चित्रपटांचे परिक्षण करण्यासाठी समिती नेमण्याबाबत व चित्रपटांना अनुदान देण्याबाबत

(८) ११३८२ (०६-०१-२०२२) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अमोल मिटकरी, श्री.अरुण लाड, श्री.बाळाराम पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.कपिल पाटील : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मराठी चित्रपटांना प्रोत्साहन मिळावे तसेच, चित्रपट सृष्टीचा अधिकाधिक विकास व्हावा या उद्देशाने शासनामार्फत दरवर्षी चित्रपटांना शासकीय अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील चार वर्षात अनुदानासाठी पाठविण्यात आलेल्या ३०० हून अधिक चित्रपटांचे परिक्षण (स्क्रीनिंग) झाले नसल्याचे अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे पदाधिकारी शिष्टमंडळाने शासनाच्या दिनांक २७ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने चित्रपटांचे परिक्षण करण्यासाठी अनुदान समिती नेमली नसल्यामुळे सदर समिती तात्काळ नेमण्यात यावी अशी मागणी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाकडून करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने चित्रपटांचे परिक्षण करण्यासाठी समिती नेमण्याबाबत व चित्रपटांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अमित विलासराव देशमुख (०७-०६-२०२२) : (१) होय हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे. कोरोना प्रादुर्भावामुळे मागील २ वर्षात महामंडळाकडे अंदाजे २६५ चित्रपटांचे परीक्षण (स्क्रीनिंग) करिताचे प्रस्ताव शिल्लक आहेत.
(३) व (४) शासन निर्णय दिनांक २३/०९/२०२१ अन्वये मराठी चित्रपटांना अर्थसहाय्य मंजूर करण्यासाठी चित्रपट परीक्षण समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत चित्रपटांचे परीक्षण सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

राज्यातील प्रमुख महानगरामध्ये नोकरी करणाऱ्या युवक/ महिलांसाठी वसतिगृह बांधण्याच्या प्रस्तावाबाबत

(९) ११७४८ (०५-०१-२०२२) श्री.विलास पोतनीस : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रमुख महानगरांमध्ये नोकरी करणाऱ्या युवक/ महिलांसाठी वसतिगृह बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे व त्याची सद्य:स्थिती काय आहे तसेच, या प्रस्तावाच्या अंमलबजावणीस किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२०-०५-२०२२) : (१) नाही.
(२) महाराष्ट्रामध्ये १३७ नोकरी करणाऱ्या महिलांची वसतिगृहे मंजूर असून सद्य:स्थितीमध्ये ८१ नोकरी करणाऱ्या महिलांची वसतिगृहे कार्यरत आहेत. केंद्रशासनाच्या दिनांक २२/११/२०१७ रोजीच्या निर्णयातील मार्गदर्शक

सुचनानानुसार सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या योजनेमध्ये अंशत: बदल करून नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहाची इमारत भाडेतत्वावर उपलब्ध करून घेऊन सुधारित योजना केंद्र:राज्य:स्वयंसेवी संस्था यामध्ये अनुक्रमे ६०:१५:२५ प्रमाणात राबविण्यास मान्यता देणेबाबतचा महिला व बालविकास विभागाचा शासन निर्णय दिनांक २३/०८/२०२१ रोजी निर्गमित झालेला आहे.

राज्यातील लोकसंख्या व नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहाची मागणी लक्षात घेता मुंबई उपनगर-६,मुंबईशहर-४,ठाणे-४,पुणे-४ व राज्यातील उर्वरित ३२ जिल्ह्याकरीता प्रत्येकी एक या प्रमाणे ५० वसतिगृहाना इमारत भाडेतत्वावर उपलब्ध करून घेऊन "नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृह" ही सुधारित योजना राज्यात राबविण्यास दिनांक २३/०८/२०२१ च्या शासन निर्णयअन्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी होणेसाठी राज्यातील सर्व जिल्हा महिला बालविकास अधिकारी यांना स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करून प्रस्ताव आयुक्तालय पुढील कार्यवाहीस्तव सादर करणेबाबत सूचित करण्यात आले होते.

"नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृह "ह्या सुधारित योजनेची अंमलबजावणी होणेसाठी राज्यस्तरावर जाहिरात प्रसिध्द करणे बाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

मराठवाड्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना कंत्राटी पध्दतीने नियुक्त्या देण्याबाबत

(१०) ११८०४ (३०-०३-२०२२) श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंशकालीन कर्मचाऱ्यांना कौशल्य विकास व उद्योजकता विभागाने तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्त्या देण्यासाठी दिनांक २ मार्च, २०१९ व वित्त विभागाने दिनांक ३० सप्टेंबर, २०२० रोजीच्या निर्णयान्वये कार्यपध्दती निश्चित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णय व परिपत्रकानुसार अंशकालीन कर्मचाऱ्यांना कंत्राटी पध्दतीने नियुक्त्या देण्यासाठी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये मराठवाड्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना कार्यवाही करण्यासाठी सूचना केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंशकालीन कर्मचाऱ्यांना कंत्राटी पध्दतीने नियुक्त्या देण्यासाठी फक्त पत्र व्यवहार होत असून कर्मचाऱ्यांची नियुक्ती होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासन निर्णयानुसार मराठवाड्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना कंत्राटी पध्दतीने नियुक्त्या देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (०६-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे,
(२) होय, हे खरे आहे.
तथापि, सूचना दिनांक ०९/०३/२०२१ च्या पत्रान्वये दिल्या आहेत.
(३) हे खरे नाही.
मराठवाडा विभागात सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २७/१०/२००९ नुसार एकूण ३४७ उमेदवारांना समांतर आरक्षणानुसार तर एकूण १५ उमेदवारांना कंत्राटी पदावर नियुक्ती करण्यात आली.
(४) शासन निर्णयानुसार कार्यवाही केली जात असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्य महिला आयोगावरील सहा अशासकीय सदस्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(११) ११९८८ (३०-०३-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ११०८७ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य महिला आयोगावरील सहा सदस्यांची पदे रिक्त असल्याची बाब दिनांक ११ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३ मधील कलम ३ मधील उप-कलम (२) नुसार महाराष्ट्र राज्य महिला आयोगावरील सद्य:स्थितीत रिक्त असलेल्या सहा अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०१-०६-२०२२) : (१) होय.
(२) महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३ (१९९३ चा महा. १५) च्या कलम ३ मधील उप-कलम (१) आणि उप-कलम २ मधील (ब) आणि कलम ४ मधील पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र राज्य महिला आयोगावरील सहा अशासकीय सदस्यांची नियुक्ती दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजीच्या अधिसूचनेव्दारे तीन वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांची पदे आऊट सोर्सींगमार्फत भरण्यात येणार असल्याबाबत

(१२) १२०८४ (३०-०३-२०२२) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनातील विविध विभाग, सार्वजनिक उपक्रम, महामंडळे,महानगरपालिका व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कर्मचाऱ्यांची कायम स्वरूपी भरती करण्याऐवजी खाजगी कंपन्यांमार्फत त्यांचे आऊट सोर्सिंग करण्याबाबचे धोरण शासनाने अवलंबिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भरतीबाबत शासनस्तरावरून घेतलेल्या निर्णयाची थोडक्यात माहिती काय आहे तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना विहित मुदतीनंतर शासन सेवेत सामावून घेण्यात येणार आहे काय, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार (०८-०६-२०२२) : (१) व (२) नाही. नियमित मंजूर पदे सेवाप्रवेश नियमानुसार विहित मार्गानेच भरण्यात येतात. कार्यालयातील जी कामे सहजरित्या बाहेरुन करुन घेणे शक्य आहे अशी कामे बाह्ययंत्रणेकडून (outsourcing द्वारे) करुन घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. बाह्ययंत्रणेमार्फत कार्यरत कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याचे कोणतेही धोरण नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये सरळसेवा व पदोन्नतीच्या अनेक जागा रिक्त असल्याबाबत

(१३) १२२२४ (३०-०३-२०२२) श्री.राजहंस सिंह : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या २९ प्रमुख विभागांमध्ये सरळसेवा व पदोन्नतीच्या मिळून २ लाख १९३ जागा रिक्त असल्याची माहिती माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये ४६ हजार ९६२ जागा जिल्हा परिषदांमधील असून सर्वाधिक २४ हजार ८७८ रिक्त जागा या गृह विभागातील, २० हजार ८७३ रिक्त जागा या जलसंपदा विभागातील तर २० हजार ५४४ रिक्त जागा या सार्वजनिक बांधकाम विभागातील आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात बेरोजगारी प्रचंड प्रमाणात वाढली असून तरुणांना नोकऱ्यांची प्रतिक्षा असताना नव्या नोकरभरती ऐवजी आऊटसोर्सिंग, कंत्राटी पध्दतीवर शासनाचा अधिक जोर असून निवृत्त कर्मचाऱ्यांना पुन्हा कंत्राटी तत्वांवर सेवेत सामावून घेतले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार (०८-०६-२०२२) : (१) व (२) हे अंशत: खरे आहे. माहे डिसेंबर, २०१९ अखेरच्या उपलब्ध आकडेवारीनुसार शासकीय आणि जिल्हा परिषद कार्यालयांमधील गट अ, ब, क व ड या संवर्गातील अंदाजे २,००,१९३ इतकी पदे रिक्त आहेत. त्यापैकी ४६,९६२ इतकी रिक्त पदे जिल्हा परिषदांमधील असून १,५३,२३१ रिक्त पदे शासकीय कार्यालयांतील आहेत. तसेच सदर आकडेवारीनुसार गृह विभागात २४,८४८, जलसंपदा विभागात २०८७३ व सार्वजनिक बांधकाम विभागात ८६२८ पदे रिक्त आहेत.
(३) नाही. नियमित मंजूर पदे सेवाप्रवेश नियमानुसार विहित मार्गानेच भरण्यात येतात. करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांच्या करण्यात येणाऱ्या नियुक्त्या ह्या केवळ विवक्षित स्वरुपाच्या कामासाठी आणि अल्प कालावधीसाठी करण्यात येतात. तसेच कार्यालयातील जी कामे सहजरित्या बाहेरुन करुन घेणे शक्य आहे अशी कामे बाहययंत्रणेकडून (outsourcing द्वारे) करुन घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) वित्त विभागाच्या दिनांक १२/०४/२०२२ च्या शासन निर्णयान्वये पदभरतीसाठी काही प्रमाणात सुट देण्यात आली आहे. त्यानुसार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागांकडून करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

धर्माबाद (जि.हिंगोली) येथे पायोनिअर डिस्टीलरीज लि. कंपनी मद्य निर्मिती करत असल्याबाबत

(१४) १२५३२ (३०-०३-२०२२) श्री.विप्लव बाजोरिया : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धर्माबाद (जि.हिंगोली) येथे पायोनिअर डिस्टीलरीज लि. कंपनी मद्य निर्मिती करत असून सदर कंपनीला धान्यापासून मद्य निर्मिती करण्याचा परवाना मिळाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पायोनिअर डिस्टीलरीज लि. कंपनीच्या कामामुळे वातावरणातील प्रदुषणात वाढ होवून त्याचा परिसरातील नागरिक व शेतकरी यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने पायोनिअर डिस्टीलरीज लि. कंपनीचा CSR चा निधी धर्माबाद येथे लोककल्याण कामासाठी व्हावा याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे व त्यासाठी किती कालावधी लागणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार (१६-०६-२०२२) : (१) मे. पायोनियर डिस्टीलरीज लि. ही कंपनी ता.धर्माबाद, जि.हिंगोली येथे कार्यरत नसून मु. पो. बाळापूर, ता.धर्माबाद, जि.नांदेड या ठिकाणी कार्यरत आहे.

मे.पायोनियर आसवनी लि. या घटकास मळीपासून प्रतीदिन १,००,००० ब.लि. अतिशुध्द मद्यार्क/जलरहित मद्यार्क उत्पादन करण्यासाठी नमुना - आय अनुज्ञप्ती क्र. ५८ मंजूर करण्यात आली आहे.
(२) केंद्र शासनाचा पर्यावरण विभाग व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या विहीत मानकानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी मान्यता दिली आहे.
(३) मे.पायोनिअर डिस्टीलरीज लि., मु.पो. बाळापूर, ता.धर्माबाद, जि.नांदेड ही कंपनी जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने जिल्ह्यामध्ये लोककल्याणाची कामे करीत असून, कोव्हिड-१९ महामारीच्या कालावधीमध्ये घटकाने १३ किलोलीटर क्षमतेच्या ऑक्सीजन स्टोरेज टँकचा पुरवठा करण्यासाठी सिव्हील हॉस्पिटल, नांदेड यांना सी.एस.आर. अंतर्गत निधी उपलब्ध करुन दिला आहे. तसेच, जलयुक्त शिवार अभियानांतर्गत गावानजिकच्या तलावातील गाळ काढून गावातील लोकांना पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड, तहसिलदार कार्यालय, धर्माबाद, नगर परिषद, धर्माबाद, जिल्हा ग्रामीण रुग्णालय, नांदेड, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड इ. विविध शासकीय व स्थानिक प्रशासन कार्यालयांना, घटकाच्या सी.एस.आर. निधीमधून कोव्हिड रुग्णांसाठी ५० बेडची सुव्यवस्था, मेडिकल इक्विंपमेंट, सॅनिटायझर्स इ. चा पुरवठा केला

आहे. तसेच, वृक्ष लागवड व बायो टॉयलेट इ. विविध लोककल्याणकारी कामांकरीता सहकार्य केलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना पूर्ववत सुरू करण्याबाबत

(१५) १२६५६ (३०-०३-२०२२) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना गेल्या सात वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासन केंद्र शासनाकडे राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना पूर्ववत सुरू करण्याबाबत पाठपुरावा करणार आहे काय व त्याची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (२६-०५-२०२२) : (१) व (२) राज्यामध्ये राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे.

राष्ट्रीय स्वास्थ विमा योजनेच्या लाभार्थ्यांचा समावेश असलेली व अधिक विमा संरक्षण असलेली राज्य शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राज्यामध्ये दिनांक २ जुलै, २०१२ पासून सुरु झाल्यामुळे शासकीय खर्चाची द्विरुक्ती होऊ नये म्हणून राज्यामध्ये राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना बंद करण्यात आली आहे.

दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ पासून सामाजिक आर्थिक, जातनिहाय सर्वेक्षणातील राज्यामध्ये ८३.६३ लक्ष लाभार्थी कुटुंबासाठी १२०९ उपचारांसाठी ५ लक्ष मर्यादेपर्यंत विमा संरक्षण असलेली केंद्र शासनाची आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राज्य शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेसोबत एकत्रितपणे राबविण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील रोजगार वाढविण्याबाबत

(१६) १३०४३ (३०-०३-२०२२) डॉ.प्रज्ञा सातव : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक १८१३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०११-२०१२ ते २०१७-२०१८ या सहा वर्षात १९ लाख बेरोजगार रोजगाराच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भातील अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर सस्टेनेबल एम्प्लॉयमेंट विभागाचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहवाल प्राप्त झाला नसल्यास शासनाने तद्संदर्भातील माहिती घेऊन राज्यात रोजगार वाढविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (०६-०६-२०२२) : (१) विभागाच्या महास्वयंम या वेबपोर्टलवर २०११ ते २०१८ या कालावधीत एकूण १८.०७ लाख इतक्या उमेदवारांनी नोंदणी केली आहे. यामध्ये काही उमेदवार हे शिक्षण, उच्च शिक्षण, उच्च शिक्षण घेत आहेत, तसेच काही उमेदवारांनी नोकरीच्या आवश्यकतेसाठी तसेच सध्याच्या नोकरीपेक्षा चांगल्या नोकरीसाठी/ स्वयंरोजगारासाठीही उमेदवारांनी नोंदणी केलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. तथापि, विभागातर्फे नोकरी इच्छूक/स्वयंरोजगार इच्छूक उमेदवारांना रोजगार वस्वयंरोजगार व उपलब्ध होण्यासाठी विविध योजना राबविण्यात येतात

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील कोच्छी बॅरेज प्रकल्पामुळे बाधित झालेल्या गावांचे पुनर्वसन करण्याबाबत

(१७) १३४७५ (१३-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील कोच्छी परिसरात सन २००७-२००८ मध्ये कन्हान नदीवर बॅरेज उभारणीसाठी प्रशासकीय मान्यता मिळून प्रकल्पाच्या कामाला सुरूवात झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पामुळे बाधित झालेल्या कोच्छी, जुनी रायवाडी व खैरी ढालगाव या गावांचे अद्याप पुनर्वसन करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सावनेर तालुक्यातील कोच्छी बॅरेज प्रकल्पामुळे बाधित झालेल्या गावांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील (२३-०५-२०२२) : (१) होय, हे खरे आहे. कन्हान नदी (कोच्छी बॅरेज) प्रकल्पास सन २००७-२००८ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळालेली असून, प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामास सन २०१२-१३ ला सुरुवात झालेली आहे.

(२) अंशत: खरे आहे. मौजा-कोच्छी या गावाचे पुनर्वसीत गावठाण कोच्छी (बावनगाव) येथे नागरी सुविधेची कामे पूर्ण झालेली आहे. तसेच सदर ठिकाणी भुखंड वाटपाची कार्यवाही महसूल विभागामार्फत सुरु आहे. मौजा रायवाडी या गावाचे पूनर्वसन गावकऱ्यांच्या सहमतीने बडेगाव येथे प्रस्तावित असून नागरी सुविधेची कामे प्रगतीपथावर आहे. तसेच भुखंड वाटप प्रक्रियेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. (खैरी) ढालगाव या गावाचे पुनर्वसन पारडी (रिठी) येथे प्रस्तावित आहे. यासाठी आवश्यक ४५.५५ हे.आर. जमीनीची संयुक्त मोजणीची कार्यवाही पूर्ण झालेली असून पुढील कार्यवाही महसूल विभागाकडुन सुरु आहे.

(३) उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणत्याही प्रकारची चौकशी करण्यात आलेली नसून पुनर्वसनाची कामे नियमानुसार प्रगतीपथावर आहेत. गावांचे पुनर्वसन करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सावनेर (जि.नागपूर) तालुक्यात कोल्हापूरी बंधाऱ्यांचे तराफे चोरीला जात असल्याने उद्‌दीष्टांची पुर्तता होत नसल्याबाबत

(१८) १३५०१ (२५-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावनेर (जि.नागपूर) तालुक्यात ठिक-ठिकाणी भुगर्भातील जलस्तर वाढावा आणि शेतकऱ्यांना ओलीतासाठी पाणी उपलब्ध व्हावे या उद्‌दीष्टासाठी पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांच्यावतीने कोल्हापूरी बंधाऱ्यांची निर्मिती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बहुतांश कोल्हापूरी बंधाऱ्यांचे तराफे चोरीला गेले असून त्या जागी नवीन तराफे लावण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, “पाणी अडवा पाणी जिरवा” हे उद्‌दीष्टपुर्ती होत नसल्याने व हे कोल्हापूरी बंधारे निरूपयोगी ठरत असल्याने या कोल्हापूरी बंधाऱ्यांना नवीन तराफे लावून त्यांची देखभाल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शंकरराव गडाख (३०-०५-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
सावनेर तालुक्यातील हेटी सावंगी, पंढरी व केळवद येथील तीन बंधाऱ्यांच्या एकूण ६३ तराफे पैकी ३० तराफे चोरीला गेले आहेत. त्याबाबत कायदेशीर तक्रार पोलीस ठाणे केळवद येथे दाखल करण्यात आली आहे.
(३) जिल्हा वार्षिक योजनेमधून सन २०२२-२३ मध्ये चोरीला गेलेले तराफे लावण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील आशा सेविका व गटप्रवर्तक यांना किमान वेतन मिळण्याबाबत

(१९) १३५९६ (०१-०६-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आशा सेविका व गटप्रवर्तक यांना सध्या अनुक्रमे रुपये १५०० व रुपये १७०० एवढे मानधन मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनातर्फे माहे जुलै, २०२० मध्ये आशा सेविका व गटप्रवर्तक यांना अनुक्रमे रुपये २००० व रुपये ३००० मानधन देण्याची घोषणा करण्यात आली असून माहे सप्टेंबर, २०२१ पासून हा निधी प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आशा सेविका व गटप्रवर्तक यांना वाढीव मानधन मिळालेले नसून माहे जुलै, २०२१ पासून या अगोदर लागू असलेले मानधनही मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने आशा सेविका व गटप्रवर्तक यांना लागू करण्यात आलेल्या मानधनासोबत वाढीव मानधन थकबाकीसह अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (२०-०६-२०२२) : (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांना केंद्र शासनाने पीआयपी मध्ये मंजूर केल्याप्रमाणे ७२ बाबींवर कामावर आधारीत मोबदला देण्यात येतो. राज्य शासनातर्फे दिनांक १७ जुलै, २०२० च्या शासन निर्णयान्वये त्यांना दरमहा अनुक्रमे रुपये २०००/- व रुपये ३०००/- तसेच दिनांक ९ सप्टेंबर, २०२१ च्या शासन निर्णयानुसार माहे जुलै, २०२१ पासून दरमहा अनुक्रमे रुपये १५००/- व रुपये १७००/- इतकी वाढ करण्यात आली आहे. एकंदरीत आशा स्वयंसेविकांना रुपये ३५००/- व गटप्रवर्तकांना रुपये ४७००/- इतका राज्य शासनाचा मोबदला मंजूर करण्यात आलेला आहे.

आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांना राज्य शासनाचा मोबदला अदा करण्याकरीता माहे मार्च, २०२२ अखेर पर्यंत रुपये २९६३९.०० लक्ष इतका निधी जिल्हा/ महानगरपालिका स्तरावर वितरीत करण्यात आला आहे.

माहे एप्रिल, २०२१ ते मार्च, २०२२ पर्यंतचा मोबदला अदा करण्यासाठी निधी व मार्गदर्शक सूचना जिल्हा/ महानगरपालिका/ नगरपालिका/ कटक मंडळे यांना करण्यात आल्या असून माहे मार्च, २०२२ अखेर रुपये ११४०३.२१ लक्ष इतका राज्य शासनाचा मोबदला आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांना अदा करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बुट्टीबोरी (जि.नागपूर) येथील इन्व्हेटिस रिसर्च कंपनी प्रा.लि. कंपनीला लागलेल्या आगीची उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत

(२०) ३३१३७ (१९-०८-२०१७) श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुट्टीबोरी (जि.नागपूर) येथील इन्व्हेटिस रिसर्च कंपनी प्रा.लि. कंपनीला लागलेल्या आगीची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ (२५-०२-२०२२) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

इन्व्हेन्टीस रिसर्च कंपनी प्रा.लि., के-३८, बुटीबोरी औद्योगिक वसाहत,नागपूर या कारखान्यात दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५ रोजी लागलेल्या आगीची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,नागपूर यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे.

चौकशीदरम्यान कारखान्यातील रिकव्हरी प्लांटमध्ये असलेल्या मिथेनॉल टाकीमधून मिथेनॉलची गळती झाल्यामुळे मिथेनॉल जमिनीवर पसरले, त्यामुळे मिथेनॉलच्या वाफेस (व्हेपर) आग लागून स्फोट झाला.

सदर दुर्घटनेत ५ कामगारांना भाजण्याच्या जखमा झालेल्या होत्या. जखमी कामगारांचा वैद्यकीय उपचाराचा रुपये १२,००,०००/- इतका खर्च कारखाना व्यवस्थापनाने केला आहे.

सदर कंपनीत कामाच्या ठिकाणी योग्य ती सुरक्षा पध्दत न अवलंबल्याप्रकरणी कारखाने अधिनियम, १९४८ च्या नियमभंगाबाबत कारखान्याच्या भोगवटादाराविरूध्द मा.अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर यांचे न्यायालयात फौजदारी खटला दाखल करण्यात आलेला आहे.

(३) लागू नाही.

विधान भवन :
मुंबई.

श्री.राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.